यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac

विद्यार्थी सेवा विभाग / Student Services Division

जा. क्र. विसेवि/८२/०८२/२०२५ **दिनांक: २९ एप्रिल २०२५**

सूचनापत्र

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या विविध शिक्षणक्रमांच्या नवीन अभ्यासकेंद्र मान्यता, पुनर्मान्यता आणि अतिरिक्त शिक्षणक्रमाच्या मान्यतेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया

पारंपारिक विद्यापीठाची मान्यता असलेल्या वरिष्ठ महाविद्यालयात वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमासाठी नव्याने अभ्यासकेंद्र सुरु करणे, अभ्यासकेंद्रावर चालविल्या जाणाऱ्या शिक्षणक्रमांची पुनर्मान्यता प्रक्रिया पूर्ण करणे आणि अतिरिक्त शिक्षणक्रमासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यापीठाने अभ्यासकेंद्रास अंतिम मान्यता दिल्यानंतरच शैक्षणिक वर्ष 2025-26 मधील त्या-त्या शिक्षणक्रमाचे प्रवेश संबंधित अभ्यासकेंद्रांवर विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी उपलब्ध होतील.

ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत 01 मे 2025 ते 30 मे 2025 आहे.

1. **Application for New Learner Support Center:** पारंपारिक विद्यापीठाची मान्यता असलेल्या महाविद्यालयांकडून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत दर्शविलेल्या पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांचे अभ्यासकेंद्र नव्याने सुरु करावयाचे आहे अशा वरिष्ठ महाविद्यालयांना या प्रक्रियेतून ऑनलाईन अर्ज सादर करता येतील. तसेच पदविका स्तरावरील शिक्षणक्रमासाठी, त्या - त्या शिक्षणक्रमनिहाय लागू असणाऱ्या निकष/नियमांनुसार महाविद्यालयांना/संस्थाना ऑनलाईन अर्ज सादर करता येतील.

2. **Application for Additional Program:** सध्या कार्यान्वित असलेल्या अभ्यासकेंद्रावर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत दर्शविलेल्या शिक्षणक्रमांची मान्यता घ्यावयाची आहे अशा वरिष्ठ महाविद्यालयांनासुद्धा या प्रक्रियेच्या माध्यमातून ऑनलाईन अर्ज सादर करता येतील.

3. **Application for Renewal of Learner Support Center:** सध्या कार्यन्वित असलेल्या अभ्यासकेंद्रावर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत दर्शविलेल्या शिक्षणक्रमांची पुनर्मान्यता पूर्ण करावयाची आहे अशा वरिष्ठ महाविद्यालयांना देखील या प्रक्रियेच्या माध्यमातून ऑनलाईन अर्ज सादर करता येतील.

अभ्यासकेंद्र मान्यता प्रक्रियेसाठी खालील संकेतस्थळाला भेट द्यावी

https://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=28422.

अ. क्र.	शिक्षणक्रम संकेतांक	शिक्षणक्रमाचे नाव
1	M117	एम. कॉम
2	G02 (New)	बी. कॉम
3	P161	बी.बी.ए - अकाऊंटिंग अँड फायनान्शियल मॅनेजमेन्ट
4	P160	बी.बी.ए - इव्हेंट मॅनेजमेन्ट
5	D201	डिप्लोमा इन इव्हेंट मॅनेजमेन्ट
6	P08	डिप्लोमा इन को-ऑपेरेटिव्ह मॅनेजमेन्ट
7	P52	डिप्लोमा इन को-ऑपेरेटिव्ह मॅनेजमेन्ट (बँकिंग)

ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी शुल्क संरचना :

1. **Registration Fee** (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील शिक्षणक्रमांसाठी नोंदणी शुल्क रु. 1000/- (विनापरतावा)
2. **School Fee** (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांसाठी विद्यापीठ स्तरावरील यशस्वी पडताळणीनंतर) शुल्क रु. 10,000/-(विनापरतावा)
3. **Programme Fee** (शिक्षणक्रमनिहाय -विद्यापीठ स्तरावरील यशस्वी पडताळणीनंतर) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील प्रती शिक्षणक्रम शुल्क रु. 5000/- (विनापरतावा)

तांत्रिक माहितीसाठी संपर्क :

ams@ycmou.ac.in

संचालक
वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

संचालक
विद्यार्थी सेवा विभाग

सोबत : शिक्षणक्रमनिहाय अभ्यासकेंद्र मान्यता निकष